# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

**दिनांक १२/०५/२०२२ (गुरूवार)**

**(सायंकाळ)**

---

## जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांना अटक
## –: स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामीण ची कारवाई :–

दिनांक ११/०५/२०२२ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक हे पो.स्टे. सावनेर परिसरात पेट्रलिंग करीत असतांना त्यांना खात्रीशीर गुप्त माहितगारामार्फत माहिती मिळाली की, एका कन्टेनर वाहनात काही लोक अवैधरित्या गोवंश जातीच्या जनावरांची वाहतुक कत्तलीचे उद्देशाने नागपुरकडे करीत आहे. अशा खबरेवरून स्थानिक गुन्हे शाखेचे पथक पो.स्टे सावनेर हद्दीतील खापा फाटयावर नाकाबंदी केली. त्यादरम्यान ०३:०० वा. एक १० चक्का कन्टेनर क्र. एच. आर– ६५/ए– २६९४ वाहन येतांना दिसले. तेव्हा सदर कन्टेनर वाहनाचे चालकास स्टाफने वाहन थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यात चार इसम बसलेले दिसले व वाहनाचे पाठी मागिल डाल्यात गोवंश जातीचे जनावर कोंबुन भरलेले दिसले. सदर १० चक्का कन्टेनर क्र. एच.आर– ६५/ए– २६९४ चे आरोपी नामे– १) गिरीधारी मुन्शी वय ४६ वर्ष, २) अफसर नवाब वय १८ वर्ष, दोन्ही रा. आर्यापुरी पो.स्टे. कैराना शामली उत्तर प्रदेश कैराना प्रबुध नगर उत्तर प्रदेश भारत ३) हिमायत इनायत खान वय ३० वर्ष, रा. बमनी नौनपुर मंडला मध्यप्रदेश लाकायुक्त मध्य प्रदेश भारत, ४) एचआर– ६५/ए– २६९४ चा ट्रक मालक मोहम्मद वासीद मोहम्मद साफीक रा. भवानी खेरा कूरूक्षेत्र हरीयाना नागपुर ग्रामीण महाराष्ट्र भारत यांनी वाहनामध्ये एकुण ३२ गोवंश (म्हैस, हले) कि. ४,०५,०००/–रू. चे जनावर क्रुर व निर्दयतेने वाहतुक करतांना मिळुन आले. आरोपीतांच्या ताब्यातुन जनावरे एकुन किमंती ४,०५,०००/– रूपयाचे व वाहन १० चक्का कन्टेनर क्र.एच.आर– ६५/ए– २६९४ किमंत २०,००,०००/– रूपये असा एकुण २४,०५,०००/– रूपयाचा मुददेमाल जप्त करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस ठाणे सावनेर करीत आहे.

आरोपीतांविरूद्ध पोलिस स्टेशन सावनेर येथे अप क्र ३५५/२०२२ कलम ११(१)(ड)(ब)(क) प्रा.नि.वाग.प्र. अधि.१९६० सहकलम ५(अ),९ महाराष्ट्र प्राणी रक्षण अधिनियम सहकलम १९२(अ) मोवाका सहकलम १०९, ३४ भादवी कायदा अन्वेय गुन्हा नोंद करण्यात आला आहे. आरोपीतांना अटक करण्यात आलेले आहे.

सदरची कार्यवाही पोलिस अधीक्षक नागपुर ग्रामीण श्री. विजयकुमार मगर, अप्पर पोलिस अधीक्षक श्री राहुल माणीकर यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक श्री. ओमप्रकाश कोकाटे, पोहवा राजेन्द्र रेवतकर, नापोशी आशिष मुंगले, किशोर वानखेडे, उमेश फुलबेल यांनी केलेली आहे.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर